**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण नवीन इमारत,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
संकेतस्थळ : https://mmrda.maharashtra.gov.in
दूरध्वनी क्र. : ०२२ - ६५९६ ४०००/७७००/७४००

**जाहिरात क्र.मुं.म.प्र.वि.प्रा.०२/२०२६** **दिनांक : १४ एप्रिल, २०२६**

**-: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पदभरती - २०२६ :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **संचालक (कामे) व संचालक (प्रणाली)** या संवर्गातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने / सरळसेवेने भरण्याकरीता, प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून दि. १४ एप्रिल, २०२६ पासून दि. ०३ मे, २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर जाहिरात व विहित अर्जाचा नमुना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in (Division → Administration → Recruitment) या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधीत अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने भरावयाच्या पदांची वेतनश्रेणी व पदसंख्या याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| **क्र.** | **पदनाम** | **७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर** | **पदसंख्या** |
|---|---|---|---|
| १. | संचालक (कामे) | एस-३० : १४४२००-२१८२०० | ०१ |
| २. | संचालक (प्रणाली) | एस-३० : १४४२००-२१८२०० | ०१ |
| | | **एकूण पदे** | **०२** |

**अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **तपशील** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | अर्ज सादर करावयाचा दिनांक | दि. १४ एप्रिल, २०२६ |
| २. | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०३ मे, २०२६ |

**१. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील संचालक (कामे) व संचालक (प्रणाली) या संवर्गातील पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता, पात्रता व अनुभव खालीलप्रमाणे आहेत :-**

१.१ संचालक (कामे)
वेतनस्तर :- एस-३० : १४४२००-२१८२००

**Director (Works)**
**S-30 : 144200-218200**

**The Appointment shall be made either :-**

(a) **By Deputation** from Government Departments or Semi Government organization including public sector undertaking, if they possess the qualification and experience prescribed in (b) below

OR

(b) **By Selection** from amongst the candidates who possess the following :-

**Educational Qualifications :-**
Degree in Civil Engineering or its equivalent from recognized University / Institution.

**Experience :-**
Appointment shall be made of a suitable candidate as below :-

i. Degree in civil engineering from an institution of repute along with a proven track record of twenty five (25) years of experience.

ii. Should have a minimum of ten (10) years experience in handling multi disciplinary engineering projects preferably in urban situations including knowledge of land acquisition and rehabilitation of project affected persons. Out of 10 years 5 years in metro railway experience is preferred.

iii. Should have experience in preparing Detailed Project Reports (DPRs).

iv. Should have knowledge and experience of all stages of planning a metro projects including before construction, during construction and post commissioning, station dispersal system, multi-model integration etc.

v. Should have experience in tender document, selection of contractors and project management consultants of important engineering structure.

vi. Should have experience and knowledge of inter-facing with State / Central Urban Local bodies, Railways, MoUD, RDSO, CRS etc.

vii. Should have experience and knowledge of complying with project related requirements of international funding institutions.

viii. The candidate should be working in S-29 : 131100-216600 for a minimum period of five (05) years.

**Age :-**
No age limit if the post is filled by deputation.
In case of appointment by selection / direct recruitment, candidate age should be 56 years.
No age limit for MMRDA employee.

एम एम आर डी ए
MMRDA

१.२ संचालक (प्रणाली)
वेतनस्तर :- एस-३० : १४४२००-२१८२००

**Director (Systems)**
**S-30 : 144200-218200**

**The Appointment shall be made either :-**

(a) **By Deputation** from Government Departments or Semi Government organization including public sector undertaking, if they possess the qualification and experience prescribed in (b) below

OR

(b) **By Selection** from amongst the candidates who possess the following :-

**Educational Qualifications :-**

Degree in Electrical / Electronics / Signaling & Telecommunication / Electronics & Telecommunication Engineering from a recognized & reputed University / Institute.

**Experience :-**

Appointment shall be made of a suitable candidate as below :-

i. Candidates should have administrative, executive or supervisory experience in a responsible capacity for not less than 10 years in Govt., Semi Govt. or any big infrastructure based organization or commercial concern of Metro / Railway (System related) work. More years of experience will be given preference.

ii. Post of responsibility for a candidate from private organization will be higher grade senior managerial posts.

iii. Candidate should have experience of working in construction projects in Government Departments / Semi Government Organization / other PSUs or Private Sectors.

iv. Candidate should be conversant with international competitive bidding, computerized environment working and latest Electrical / Electronics / Signaling & Telecommunication / Systems engineering technologies etc

v. Adequate experience in planning, designing, supply, testing & commissioning of Rolling stock, Electric, General Services and Electric Traction etc for elevated Metro / Rail Projects in urban area & suburban environment.

vi. Candidates with experience of working of modern urban rail will be given preference.

vii. Should have experience & knowledge of inter-facing with Central & State Govt. Departments, Railway related disciplines such as co-ordination with MoUD, Railways, RDSO and CRS etc.

viii. Should have experience & knowledge of complying with project related requirements of international funding institutions like JICA / World Bank.

ix. The candidate should be working in S-29 : 131100-216600 for a minimum period of five (05) years.

**Age :-**

No age limit if the post is filled by deputation.
In case of appointment by selection / direct recruitment, candidate age should be 56 years.
No age limit for MMRDA employees.

एम एम आर डी ए
MMRDA

## २. <u>अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना</u> :-

२.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://mmrda.maharashtra.gov.in (Division → Administration → Recruitment) या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी.

२.२ उमेदवारांना अर्ज सादर करताना जाहिराती संबंधित काही समस्या उद्भवल्यास मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या (vacancymmrda@mailmmrda.maharashtra.gov.in) या ई-मेलवर अथवा दूरध्वनी क्र. : ०२२ - ६५९६ ४०००/७७००/७४०० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. कार्यालयीन वेळ सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत (शनिवार / रविवार (साप्ताहिक सुट्टया))

२.३ वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी.) परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र ग्राह्य समजण्यात येईल.

२.४ शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक ती माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

२.५ उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरतीप्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार आणि इतर माहिती भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे. उमेदवाराने चुकीची माहिती भरल्यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

एम एम आर डी ए
MMRDA

२.६ महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला कागदपत्रे पडताळणी करुन जमा करणे आवश्यक आहे. तसेच एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

२.७ अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. आवश्यकतेनुसार मूळ शैक्षणिक / इतर कागदपत्रांची संबंधित शैक्षणिक विद्यापीठ / संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात येईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२.८ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज स्विकृत केला जाणार नाही.

२.९ काही अपरिहार्य कारणास्तव जाहिरातीमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://mmrda.maharashtra.gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केले जाणार नाही.

## ३. <u>लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन</u> :-

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनुसार, शासकीय सेवेतील भरती मध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन नियुक्ती वेळेस हजर होताना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील. प्रतिज्ञापनामध्ये नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंबाचा अर्थ दोन अपत्यांसह पत्नी व पती असा आहे.

**४.** **<u>निवडसुचीची कालमर्यादा :-</u>**

४.१ शासन निर्णय, क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०२ डिसेंबर, २०२५ अन्वये, निवड समितीने तयार केलेली निवडसुची २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य धरेल. तसेच ही मुदतवाढ निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल.

४.२ निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजीकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या – त्या प्रवर्गाच्या निवडसुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून निवडसुचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसुचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

४.३ पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

**५.** **<u>सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-</u>**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता / परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

५.१ शासन नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी लागेल.

५.२ चारित्र्य-पुर्व चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

५.३ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३६ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.), क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व दिनांक १६ जुलै, २०१८ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी / वापरण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**६.** **<u>सर्वसाधारण अटी :-</u>**

उमेदवारांनी अर्ज सादर करताना अर्जात भरलेल्या माहितीपुष्ठयर्थ प्रमाणपत्रांच्या प्रती जोडणे आणि निवडीस पात्र ठरलेल्यांनी मुलाखतीस येताना अर्जात माहिती भरल्याप्रमाणे संबंधीत मुळ प्रमाणपत्रे व साक्षांकित प्रमाणित प्रमाणपत्रांसह हजर रहाणे अत्यावश्यक आहे.

६.१ उपरोक्त संवर्गातील पदांकरीता नमूद केलेले वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापर्यंत ग्राहय धरण्यात येतील त्यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६.२ केंद्र / राज्य / निमशासकीय, PSU, LDBs मध्ये काम करणारे अधिकारी विहित पात्रता निकष, समकक्ष वेतनश्रेणी आणि ग्रेड पे या पदासाठी वरील भरती नियमांमध्ये नमूद केलेल्या इतर आवश्यकतांच्या पूर्ततेची पुष्टी केल्यानंतर योग्य त्या मार्गाने प्रतिनियुक्तीवर अर्ज करु शकतात.

६.३ शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाचे **"ना हरकत प्रमाणपत्र"** (दिलेल्या प्र-पत्रामध्ये) योग्य त्या मार्गाने सादर करणे अत्यावश्यक आहे.

एमएमआरडीए
MMRDA

६.४ उमेदवाराची नियुक्तीकरीता निवड झाल्यास, सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचे / मूळ नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र, ना देय तसेच विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरण इ. प्रलंबित / प्रस्तावित अथवा सुरु नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे शासन नियमानुसार बंधनकारक आहे.

६.५ सदरहू जाहिरातीला अनुसरुन जे उमेदवार अर्ज करतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. या संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

६.६ प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांमधून उमेदवारांची मुलाखतीअंती गुणवत्तानिहाय पात्रता सुची बनविण्यात येईल.

६.७ निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

६.८ विहीत अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करुन त्यांचे अर्ज घोषणापत्रासह या जाहिरातीसोबतच्या **विहित नमुन्यामध्येच** आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती साक्षांकीत करुन सादर करावेत. (नमुना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) इतर कोणत्याही प्रनमुन्यातील अर्ज अवैध मानण्यात येतील आणि गणण्यात येणार नाहीत.

६.९ अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६.१० अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा अर्ज विहित मुदतीत प्राधिकरणात पोहोचेल याची दक्षता व कटाक्षाने नोंद घ्यावी अन्यथा टपाल खात्याची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता ते आपोआपच रद्द ठरतील.

६.११ अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक / अनिवार्य आहे. अन्यथा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

६.१२ निवड प्रकियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा आयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

**७.** **प्रतिनियुक्तीने नेमणूकीकरिता** अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी कृपया अर्ज भरण्यापूर्वी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दि.१७ डिसेंबर, २०१६ आणि शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/ कार्या.१२ दि.१६ फेब्रुवारी, २०१८ तसेच क्र.एमआरव्ही-३३२२/प्र.क्र.१४०/नवि-७, दि.२० जुलै, २०२३ पहावेत. यातील काही ठळक वैशिष्टये याप्रमाणे आहेत :-

| | |
|---|---|
| (i) | उमेदवार हा केंद्र शासन / राज्य शासन / निमसरकारी शासन सेवेत **समतुल्य पदावर / वेतनश्रेणीत** कार्यरत असावा आणि संबंधित पदाची अर्हता धारण करणारा असावा. उमेदवारांनी त्यांचे सध्याचे पद, वेतन श्रेणी आणि ग्रेड पे अर्जामध्ये सुस्पष्ट नमूद करावेत. |
| (ii) | परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करून त्यानंतर किमान **५ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावरच** त्यांना या मार्गाने नियुक्तीसाठी इच्छुकता देता येईल. |
| (iii) | ज्यांची नियुक्ती परिविक्षाधीन म्हणून झालेली नाही अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या, नियमित नियुक्तीपासून **किमान ७ वर्षे सेवा** कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांना या मार्गाने अर्ज करता येईल. |
| (iv) | **उमेदवाराने, केवळ सोबत जोडलेल्या प्रनमुन्यामध्येच - त्यांच्या मूळ विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत / मुलाखतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य आहे.** याची पुर्तता झाली नसल्यास, अर्ज विचारात घेतला जाणार नाही. यानंतर उमेदवाराची प्रतिनियुक्तीवर निवड झाल्यास, त्यांच्या मूळ विभागाला नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने संबंधितास कार्यमुक्त करणे संवर्ग नियंत्रक अधिकाऱ्याला बंधनकारक राहिल, याची कृपया नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| (v) | उमेदवारांनी त्यांच्या मूळ विभागाचे (अ) सा.प्र.वि.चा शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ आणि १६.०२.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार उमेदवार सर्व अर्हता धारण करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र, (ब) अलीकडचे ५ वर्षांचे गोपनीय अहवाल (साक्षांकीत प्रती), (क) संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरण, म.ना.से.नियमांतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे किंवा कसे तसेच मागील १० वर्षांच्या सेवेत झालेल्या शिक्षेचा तपशील इत्यादी माहिती १० कार्यालयीन दिवसांत पाठविणे आवश्यक आहे. |
| (vi) | अर्जदाराच्या **संपूर्ण सेवेत कमाल १० वर्षांपेक्षा जास्त** कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर जाता येणार नाही. यापैकी एका वेळेस ५ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता प्रतिनियुक्तीवर जाता येणार नाही. परंतु, सेवानिवृत्तीस २ वर्षांचा कालावधी शिल्लक असतांना प्रतियुक्तीवरील अधिकाऱ्यास मूळ संवर्गात परत येणे आवश्यक राहिल. |
| (vii) | प्रतिनियुक्तीसंदर्भातील नेमणूकांना उपरोल्लेखित शासन निर्णयातील तरतूदींसह **महाराष्ट्र नागरी सेवा नियममधील अटी लागू** रहातील. |
| (viii) | ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्हयांसंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरणे, म.ना.से.नियम १९७९ अंतर्गत नियम ८ खाली अथवा तत्सम नियमांखाली **चौकशी सुरु आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे,** असे उमेदवार अर्ज करु शकणार नाही. |
| (ix) | पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास उपरोल्लेखित शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ आणि शासन निर्णय दिनांक १६.०२.२०१८ मधीन अटी व शर्तीच्या अधीन राहून नेमणूक करण्यात येईल.उपरोक्त पदांचा सेवा कालावधी **प्रथमत: १ वर्षाचा असेल** मात्र या पुढील कालावधी त्यावेळची निकड, गरज तथा आवश्यकता पाहून संबंधीत अधिकारी कार्यतत्परता आणि गुणवत्तेच्या आधारे सेवा कालावधीमध्ये वाढ होऊ शकेल. |
| (x) | प्रतिनियुक्तीने नेमणूकीसाठी वयाची तसेच आरक्षणाची अट लागू नाही. |
| (xi) | प्रतिनियुक्तीने नेमणूकीकरिता अर्ज विहित मार्गाने सादर करावेत. |
| (xii) | परिविक्षाधीन कालावधी सुरु असतांना कोणत्याही अधिकारी / कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीसाठी अर्ज सादर करता येणार नाही. |
| (xiii) | प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रानुसार वेतन अधिक नियमानुसार प्रतिनियुक्ती भत्ता देण्यात येईल. म.ना.से.नियम व प्रतिनियुक्तीसंदर्भातील शासन आदेशानुसार तसेच परस्परांनी मान्य केलेल्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार लाभ व सुविधा अनुज्ञेय राहतील. |
| (xiv) | उपरोक्त व्यतिरिक्त शासन निर्णयात नमूद सर्व संबंधित अटी आणि शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारे आदेश उमेदवारांना बंधनकारक असतील. |

## ८. <u>सर्वसाधारण सूचना :-</u>

८.१ अनुभवाच्या कालावधीची गणना जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांकापर्यंत पूर्ण केलेली असावी. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३ जुलै, २००४ अन्वये, अनुभवाच्या कालावधीची गणना करताना अल्प कालावधीची किंवा तासिका तत्वावर, अतिरिक्त कार्यभार, प्रशिक्षण अभ्यागत किंवा अंशदानात्मक अशा स्वरुपाचे काम केलेल्या उमेदवारांना जर ते काम पूर्ण वेळ केलेले नसेल तर तो अनुभव नियुक्तीसाठी असल्याचे गृहित धरण्यात येणार नाही. त्यामुळे या प्रश्नाचा सर्वकष विचार करून आदेशानुसार सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवाराच्या अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना रोजंदारी, कार्यव्ययी, करारपध्दतीवर, मानधन इत्यादी स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी नियुक्तीसाठी विहित केलेल्या अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल.

मात्र तासिका (on hour basis), नियतकालीक (periodical), अंशकालीन (part time), विद्यावेतन (on stipend), अभ्यागत (visiting), अंशदानात्मक (contributory), विनावेतन (without pay) तत्वावर केलेल्या अंशकालीन कालावधी, तसेच प्रभारी (Incharge) म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा (Addl.

एम एम आर डी ए MMRDA

Charge) कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. ज्या पदांसाठी खाजगी संस्थाचा अनुभव निश्चित केलेला आहे, अश्या खाजगी संस्था प्रचलित शासकीय धोरण / नियम यानुसार नोंदणीकृत असाव्यात.

८.२ शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

८.३ जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. जाहिरातीतील तांत्रिक / लेखानिकी चुकांचा फायदा उमेदवारांना घेता येणार नाही.

८.४ पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / शासन शुध्दीपत्रक / शासन अधिसूचना यानुसार सदर पदभरती नियम / निकषामध्ये बदल होऊ शकतो.

८.५ शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सेवाविनियम आणि महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी बंधनकारक असतील.

८.६ उमेदवारांनी त्यांचे नावात बदल केला असल्यास त्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे / शासन अधिसूचना (गॅझेट) सादर करणे आवश्यक राहील.

८.७ कागदपत्रे पडताळणीसाठी शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, विहित शैक्षणिक अर्हताबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे, संगणक प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८.८ कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा व स्वत:चे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

८.९ सदर भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

८.१० उपरोक्त भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, प्रतिनियुक्ती/रळसेवा भरती प्रक्रियेच्या जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे / नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे / अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण राखून ठेवत असून, त्यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना राहतील. याबाबत उमेदवारांना कोणताही हक्क / दावा सांगता येणार नाही. सदर भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे राखून ठेवत आहे.

## ९. <u>विशेष सुचना :-</u>

९.१ अर्जदाराने पाकिटावर डाव्या बाजूला ठळक अक्षरात पदाचे नांव आणि नियुक्तीचा मार्ग (प्रतिनियुक्ती / सरळसेवा) नमूद करावा.

९.२ एका उमेदवाराला एका वेळी एकाच प्रकारच्या नियुक्तीकरीता अर्ज करता येईल. (प्रतिनियुक्ती / सरळसेवा यापैकी एक) दोन अर्ज केल्यास अर्ज बाद ठरविण्यात येईल.

९.३ विहीत अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करुन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडून उप महानगर आयुक्त, प्रशासन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नवीन इमारत, ८ वा मजला, वांद्रे –कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांचेकडे अर्ज **दिनांक ०३ मे, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** पाठवावेत.

**सही /-**
**महानगर आयुक्त,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

**स्थळ :- मुंबई**
**दिनांक :- १४ एप्रिल, २०२६.**